Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P053

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय समाजव्यवस्था (प्राचिन आणि आधुनिक) आणि संविधान

**प्रकाश मोतीराम मेश्राम***
पीएच.डी.विद्यार्थी (समाजशास्त्र विभाग)
&prakashmeshram109@gmail.com

**प्रा. डॉ. अशोक ता. बोरकर****
समाजशास्त्र विभाग प्रमुख
रा.तु.म. नागपूर, विद्यापीठ नागपूर

❖ **सारांश -**

भारतीय समाजव्यवस्थेत (समाजरचनेत) त्या त्या काळानुसार बदल झालेले दिसून येतात. ही समाजव्यवस्था स्थिर स्वरूपाची असलेली दिसून येत नाही. कधी समाजरचनेत समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय दिसून येते तर कधी ती विषमतेवर आधारित दिसून येते. त्याचे प्रतिबिंब आणि सुधारणा हया भारतीय संविधानात आपणास दिसून येतात. भारतीय संविधान हे लोकशाहीवादी तसेच कल्याणकारी आहे. जे प्रत्येक नागरिकाला अनेक हक्क-अधिकार प्राप्त करुन देण्यास कटीबद्ध आहे. भारतीय संविधानाने विषमतेला नाकारुन समातावादी समाजरचना निर्माण करण्यास महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. समाजात असलेल्या वाईट, चालीरिती, प्रथा, परंपरा यांना नाकारुन नवा समतावादी समाज निर्माण करणे हे उद्दिष्ट संविधानाने ठरविले आहे. त्याकरिता संविधानाने प्राचिन तसेच आधुनिक काळातील उच्च नैतिक मूल्यांचा स्विकार केलेला आहे. त्याद्वारे नागरिकांना आपला विकास करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. प्रस्तुत अध्ययनात भारतीय समाजव्यवस्था आणि संविधानाच्या तुलनात्मक बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

❖ **मुख्य बिंदू -** भारतीय समाजरचना, भारतीय संविधान

❖ **प्रस्तावना -**

जगातील अतिप्राचीन समाजापैकी भारतीय समाज हा एक असून त्याची पाळेमुळे ही हजारो वर्षापूर्वीच्या सिंधू संस्कृतीमध्ये दिसून येतात. भारताने प्राचिन काळापासून विविध धर्म, संस्कृती, परंपरा तसेच जीवनपद्धतीला आत्मसात करुन एक अद्वितीय समाजरचनेला निर्माण केले आहे. भारतीय समाजरचनेची अनेक वैशिष्टये आहेत. त्यात कुटूंब केंद्रित जीवन, धार्मिक मूल्ये, वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, स्त्री-पुरूषांची सामाजिक भूमिका तसेच कर्मप्रधान जीवनदृष्टी इत्यादी वैशिष्टये आहेत. धर्म तसेच नीती या बाबींना या प्राचिन समाजरचनेत सर्वोच्च स्थान दिले गेले आहे.

मध्ययुगीन कालखंडात जैन, बौद्ध, सुफी तसेच संतपरंपरा याद्वारे भारतीय समाजामध्ये विविध तत्वे दृढ केले. त्यामध्ये समता, बंधुता, मानवता आणि भक्ती ही तत्वे होत. संतांनी समाजात असलेल्या जातीव्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविला. आधुनिक काळात समाजसुधारकांचे कार्य (राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, महात्मा गांधी, सवित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे) याबरोबरच पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यामुळे भारतीय समाजरचनेत आमुलाग्र असे बदल घडून आले. अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण, जातीभेद निर्मूलन, विधवा पुनर्विवाह, आधुनिक विज्ञानवादी दृष्टीकोण याद्वारे भारतीय समाज हा आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला आहे.

भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगासमोर पाऊल टाकले आहे. याप्रसंगी भारतीय समाजात असलेल्या विविधतेला एकत्र बांधणारे तसेच सर्व भारतीयांना सम-समान हक्क देणारे भारतीय संविधान हे प्रमुख मार्गदर्शक ठरलेले आहे. संविधानाद्वारे सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची हमी दिलेली आहे. याबरोबरच स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजकल्यानकारी राज्यव्यवस्था, दूर्बल घटक (अनुसुचित जाती- जमाती) व मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी विशेष तरतुदी या घटकांना महत्वपूर्ण स्थान दिले आहे.

आधुनिक भारतीय समाज हा प्रामुख्याने प्राचिन सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक लोकशाही मूल्ये यांच्या संगमातून घडलेला आहे. एकीकडे प्राचिन संस्कृतीची विविधता, कुटूंबपद्धती तसेच धार्मिक परंपरा जतन केल्या जातात तर दुसरीकडे आधुनिकतेमुळे विज्ञान, तंत्रज्ञान, नागरिकरण, औद्योगिकरण तसेच जागतिकीकरण यांचा प्रभावसुद्धा स्पष्टपणे दिसून येतो. या बदलत्या समाजाला भारतीय संविधान दिशा देत आहे. सर्वांना समान हक्क व संधी उपलब्ध करुन देत आहे. शिवाय राष्ट्रीय एकात्मता जपून ठेवण्याचे काम करत आहे.

❖ **अध्ययन पद्धती -** प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून या विषयाशी संबंधीत आधार सामग्रीचे संकलन करण्यासाठी विविध पुस्तके, ग्रंथसंपदा, विषेशांक, मासिके, वृत्तपत्रातील प्रकाशीत लेख, संदर्भ साहित्य, इंटरनेटवरील माहिती इत्यादीचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण केला आहे. यात वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आला.

❖ **अध्ययनाचा उद्देश्य -**

१) भारतीय समाजरचनेची (प्राचिन-आधुनिक) माहिती मिळवणे.

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

२) भारतीय समाजरचना (प्राचिन-आधुनिक) आणि संविधानातील समाजरचनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३) भारतीय समाजरचनेचा संविधानावर पडलेला प्रभाव लक्षात घेणे.

❖ **तथागत बुद्धाची शिकवण आणि भारतीय संविधान -**

बुद्धाला समतेचा अग्रदूत मानले जाते. बुद्धाच्या धम्मामध्ये, संघामध्ये विषमतेला थारा नसल्यामुळे सर्वच जातीचे, वर्णाचे लोक प्रवेश करु शकत होते. तथागत बुद्धाने जातीभेद, वर्णभेद नाकारला आणि ''न जातिने ब्राम्हणो होति'' अर्थात जातीनुसार कोणी श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही अशा प्रकारे समतेचा संदेश त्याने दिला. याबरोबरच त्याने लोकशाहीचा पुरस्कारही आपल्या संघात केल्याचा दिसून येतो. ''बुद्धाने संघाचा विकास अखंड प्रयोगशीलतेने केला. संघ प्राथमिक अवस्थेत असता गृहस्थांना दीक्षा तो एहि भिक्खु (ये, भिक्षू) एवढयाच आव्हानाने देत असे. संघाचा प्रसार झाल्यानंतर त्याने दीक्षा व्यक्तिगत न ठेवता संघगत केली. विहारस्थित सर्व भिक्षूंच्या सन्निपात सभेसमोर नवागताच्या नावाची ज्ञप्ति त्याला जाणणारा चतूर व समर्थ भिक्षू मांडी. अनुश्रवणाने ज्ञप्तिची तो दोनदा पुनरावृत्ती करी. तोपर्यंत कोणी विरोध न केल्यास धारणा म्हणून ती संघाने मंजूर केल्याचे तो जाहीर करी. नवागत मग भिक्षू बने. राजकीय गणसभेत समय-ठराव असेच मंजूर होत. संघातही कोणतेही ठराव मंजूर करण्यासाठी बुद्धाने गणप्रथाच प्रचलित केली. संघाच्या सर्वसामान्य भिक्षूंना संघाच्या सर्व कामकाजात सहभागी करणे हा संघाच्या लोकशाहीचा व समतेचा पाया होता'' (पाटील - २६). बुद्धाच्या संघात लोकशाही प्रक्रियेच्या आधारे निर्णय, समुहचर्चा व बहुमत पद्धतीने होत असे. याचा भारतीय संविधानात अंगीकार करण्यात आला आणि कलम - ३२६ नुसार सार्वत्रिक प्रौढ मताधिकार प्रत्येक भारतीयाला देण्यात आला. याद्वारे लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधिमार्फत सत्ता राबविल्या जाते.

बुद्धाने विषमतेने बरबटलेल्या जातीप्रथेचा विरोध केला. त्याच्या मते सर्व मानव हे समान आहेत. मज्झिमनिकायच्या वासेठ्ठसुत्तात तो वासेठ्ठ ब्राम्हणाला सांगतो-

**''जाति-विभंगं पाणानं अå=kMå=k हि जातियो।**
**एवं नत्थि मनुस्सेसु लिंगं जातिमयं पुथु।।"**

अर्थात - वनस्पती व मानवेतर प्राणि जातींमध्ये विभाजित आहेत; पण माणसे जातीत विभाजित असल्याचे कोणतेही चिन्ह नाही (पाटील - १६). भारतीय संविधानाने समतेचा पुरस्कार केला. "भारतीय संविधानातील कलम-१४ अनुसार कायदयापुढे सर्व समान मानल्या गेले. उच्च-निचतेला अस्विकृत केल्या गेले. तर कलम-१५ नुसार जात, धर्म, लिंग अथवा जन्मस्थान यावर आधारित भेदभावास मनाई करण्यात आली. शिवाय कलम-१७ नुसार अस्पृश्यता समाप्त करण्यात आली. जी विषमतेला थारा देणारी होती" (संविधान, ३९-४१). भारतीय संविधान निर्मात्यांनी बुद्धाची समतेची शिकवण संविधानात अंगीकृत केलेली आहे असे स्पष्ट दिसून येते.

बुद्ध हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. संघात सर्वांच्या विचाराला मांडण्याची संधी होती. याच आधारे ''अत्त दीप भव'' अर्थात स्वतःचा दिपक स्वतः बना. अंधानुकरण करु नका असे ते म्हणत. हे स्वातंत्र्य विविध रूपात भारतीय संविधानात आपणास दिसून येते. "संविधानाने भारतातील प्रत्येक व्यक्तिला कलम १९(१) (क) नुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केले आहे. कलम १९(१) (छ) नुसार कोणताही व्यापार, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना आहे. तर कलम-२५ अन्वये प्रत्येक व्यक्तीला सद्सद्विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्तपणे प्रकटीकरण करण्याचे, प्रचार-प्रसार करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे" (संविधान - ४२-४५). बुद्धाने स्वातंत्र्याला फार महत्व दिले आहे. तेच भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिले.

बुद्धाने मैत्रिभाव (मेत्ता, करुणा, मुदिता, उपेक्षा) मानवी जीवनात महत्वपूर्ण मानला. जो सर्वच सजिवांसोबत दर्शविणे आवश्यक आहे. अर्थात तो बंधुभावच होय. बुद्धाच्या संघात मैत्रिभाव अर्थात बंधुभाव पाळल्या जात असे. बंधुभावाचे तत्व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत नमुद करण्यात आले. समाजात ऐक्य तसेच एकात्मता सुनिश्चित करण्यासाठी संविधानाने त्यास महत्व दिलेलं आहे. काया, वाचा, मनाने हिंसा घडून येत असते. बुद्धाने हिंसेचा विरोध केला आणि अहिंसेची शिकवण दिली. अहिंसेमध्ये प्राणी, मानव तसेच निसर्ग या घटकांना बुद्धाने समाविष्ट केले. तसेच सामाजिक न्यायाला चालना दिली. जो गरीब, वंचित आणि महिलांच्या समान स्थानाशी संबंधीत आहे. बुद्धाने त्याचा पुरस्कार केला. याच दृष्टीने भारतीय संविधानामध्येही त्याचा स्विकार केल्याचे दिसून येते. "कलम-२१ अनुसार प्रत्येकाला जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण प्रदान करण्यात आलेले आहेत. कलम-३८ नुसार राज्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित करणे यासाठी प्रयत्नशील असावे असे नमुद आहे. कलम ४६ नुसार अनुसुचित जाती, जनजाती तसेच दूर्बल घटक यांच्यासाठी राज्य विशेष काळजी करेल असे नमुद आहे" (संविधान -४३-५२).

तथागत बुद्धाचे विचार (शिकवण) आणि भारतीय संविधानातील कलमे यात बऱ्याच प्रमाणात साम्य दिसत असले तरी भारतीय संविधानातील हक्क वा तरतुदी हया न्यायालयीन पातळीवर लागू करता येतात. त्याबाबत 'राज्य धोरणांची निदेशक तत्वे' (Directive Principles of State Policy) आहेत. तसे बुद्धाच्या शिकवणूकीचे नाही तर ते व्यक्तिगत अथवा सामाजिक बदलांवर अवलंबून आहे. ते कायदेशीर असे आदेश नाही. बुद्धाने दुःखाचे कारण व त्याचे निवारण सांगितले. संविधानात त्याकरिता समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय ज्याद्वारे व्यक्तीचे दुःख निवारण होण्यास मदत होते.

- **सम्राट अशोककालीन समाजव्यवस्था आणि भारतीय संविधान -**

"सम्राट अशोकाचा शासनकाळ (इ.स.पू. २७२-२३२) भारतीय इतिहासातील अतिउज्वल असा काळ आहे. सामान्य जनतेच्या कल्याणाचा बुद्धाचा विचार त्याला भावला आणि राज्याची साधनसंपत्ती आमोद प्रमोदाऐवजी त्याने प्रजेच्या कल्याणासाठी खर्च केली. प्राचिन काळातील जगातील महत्तम व्यक्तिंमध्ये अशोकाची गणना होत असे. समस्त प्राणीमात्रांबद्दल असलेल्या त्याच्या दया व सहानुभूतीला तोड नाही. उदारतेची मूर्ती, मानवतेचा पुजारी, सर्वसामान्य जनतेचा राजा म्हणून त्याची इतिहासात नोंद आहे" (कौसल - २०). यामुळेच सम्राट अशोकाचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले आहे. त्याच्या काळातील कलिंग युद्ध त्याचे हृदयपरिवर्तन करणारे महत्वाचे ठरले आणि बौद्ध धम्माप्रतीची ओढ अधिकच वाढलेली दिसून येते. बौद्ध धम्म हा मानवतावादी धम्म असल्याने त्याने बौद्ध धम्मास राजाश्रय दिला. त्याने आपल्या काळात समाजजीवनाला एक नवी दिशा देण्याचे काम केले. आपल्या देशाच्या संविधानानेसुद्धा लोकशाही, समानता, बंधुता आणि कल्याणकारी राज्य या मूल्यांचा अंगीकार केला आहे. याच अर्थाने सम्राट अशोककालीन समाजव्यवस्था आणि भारतीय संविधान यांची तुलना केली असता त्यामध्ये अनेक साम्यस्थळे आपणास दिसून येतात.

**सम्राट अशोककालीन समाजव्यवस्था -** सम्राट अशोक हा केवळ शासक नसून तो एक समाजसुधारक होता. कलिंग युद्धात झालेला नरसंहार बघता त्याचे हृदयपरिवर्तन होऊन त्याने बौद्ध धम्माच्या मार्गाचा अवलंब केला. अहिंसा, धम्मनिष्ठा तसेच नैतिक मूल्यांचा त्याने स्विकार केला. "तत्कालीन समाजात जातीव्यवस्थेमुळे विषमता होती. शूद्रांना नागरिक अधिकारांपासून पूर्णतः वंचित करण्यात आले होते. अशा परिस्थितीत कोणताही भेदभाव न करता राज्यातील जनतेला आपल्या मुलासमान समजणारा व त्यांच्या सुख समृद्धीची काळजी घेणारा जगातील हा एकमेव राजा दिसतो. राज्याच्या न्यायव्यवस्थेद्वारा कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी वाहणारा हा राजा आहे" (कौसल - २२). सम्राट अशोक स्वातंत्र्यप्रेमी होता. त्या काळात समाजात विविध संप्रदाय होते व त्यांचे आपापसात पटत नसे. यावर सम्राट अशोकाची भूमिका सलोख्याची होती. शाहबाजगढी (पेशावर, पाकिस्थान) शिलालेख सात मध्ये तो म्हणतो, "सर्व संप्रदायाच्या लोकांनी राज्यात कोठेही सलोख्याचे राहावे" (कौसल-२४). त्या काळात व्यापारी, धर्म तथा संप्रदायाशी संबंधित लोक देशभर भ्रमण करित असत. त्यामुळे या कार्यात त्यांना अडथळा येऊ नये म्हणून देशभर मुक्तपणे संचार करण्याचा आदेश सम्राट अशोकाने दिला असावा. भारतीय संविधानाच्या कलम १९ (१) (४ व ५) मध्ये अशाच प्रकारची तरतुद घटनाकारांनी केली आहे.

सम्राट अशोकाने जातीभेद आणि समाजात असलेली विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांचा सन्मान राखण्यासाठी काही सुधारणा सुद्धा केल्या. "बुद्धाचा धम्म हा कोणत्याही प्रकारचा भेदभाव मानत नसे. या धम्माने नेहमी समतेचा पुरस्कार केला. त्यामुळे समाजात एकोपा निर्माण होण्यास मदत झाली. असा हा चांगला विचार सर्वत्र पोहचावा व त्यायोगे समताधिष्ठित समाजनिर्मिती व्हावी आणि या कार्यात सातत्य असावे यासाठी अशोकाने धम्म-महामात्रांची नियुक्ती केली होती" (कौसल-२४).

सम्राट अशोकाने बंधुभाव वाढीस महत्वपूर्ण कार्य केले. "जनतेने एकमेकांच्या धर्माचा आदर करावा. अकारण एक-दुसऱ्याच्या धर्मांची निंदानालस्ती करणे टाळावे"(लव्हात्रे, १०६). असे तो गिरनार (कठियावाड, गुजरात) शिलालेख बारा मध्ये म्हणतो .

राज्यकारभाराच्या दृष्टीने सम्राट अशोकाने आपल्या सत्तेचे विकेंद्रिकरण केल्याचे दिसून येते. राज्यकारभार सुरळीत चालावा ही त्याची कल्पना होती. त्यांच्या लौरिया-अरराज (चंपारण, बिहार) येथील स्तंभलेख चार मध्ये तो म्हणतो, "मी राजुकांना (प्रांतीय गवर्नर) लाखो प्राण्यांवर (लोकांवर) नियुक्त केले आहे. अभिहार (व्यवहार किंवा कायदा) आणि दंड (न्याय) त्यांच्या अधिन केले आहे. जेणेकरुन निश्चिंत आणि निर्भयपणे त्यांनी आपले कर्तव्य पार पाडावे. जानपद जनांचे (आम जनता) हित आणि सुख वितरित करुन अनुग्रहित करावे. सुख आणि दुःखाचे कारण जाणून घ्यावे. राजुकांना व्यवहार (कायदा) आणि दंड (न्याय) या क्षेत्रात स्वतंत्रता बहाल केली आहे. जेणेकरुन निर्भय आणि निश्चिंतपणे एकचित्ताने स्वतःचे काम पार पाडावे, जे व्यवहार-समता आणि दंड-समता वांछित आहेत. माझा असा आदेश आहे की, जे लोक कैदेत आहेत ज्यांचा

विचार झाला आहे (कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली आहे) आणि ज्यांना मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे, त्यांना मी तीन दिवसाची सवलत दिली आहे. या अवधित त्यांचे नातेवाईक दया याचनेसाठी (जीवदान) राजूकाकडे पुनर्विचार अर्ज करु शकतात'' (कौसल-३०-३१).

अशोकाचे राज्य हे कल्याणकारी राज्य होते. त्याने जनतेसाठी रूग्नालये, औषधांची सोय, धर्मशाळा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वृक्षारोपण अशा अनेक योजना राबविल्या. प्राणी तसेच पर्यावरण संवर्धनासाठी त्याने अनेक कायदे केले. लोकांच्या दुःखास आपले दुःख समजून त्यांच्या दुःखात तो सहभागी होत असे.

**भारतीय संविधानातील समाजव्यवस्था -** भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. ते आधुनिक समाजव्यवस्थेचे मूळ आहे. या संविधानाने जनतेला नवे हक्क-अधिकार, कर्तव्ये आणि समताधिष्ठित जीवन दिले. सम्राट अशोकाच्या काळातील समाजव्यवस्थेचे अनेक घटक भारतीय संविधानात दिसून येतात. त्यात समता (समानता) आणि न्याय यात अनुच्छेद १४ ते १८ मध्ये सर्व नागरिकांना कायदयापुढे समानता दिली आहे. अस्पृश्यता, जातीभेद तसेच सरंजामशाहीचा अंत करण्यात आला आहे. सर्वांकरिता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय हा मूलभूत उद्देश आहे. संविधानात स्वातंत्र्य व बंधुता याचा अंगीकार केला आहे. त्यात अनुच्छेद १९ ते २२ मध्ये विचार, अभिव्यक्ती, धर्म, चळवळ आणि संघटना यांचे स्वातंत्र्य प्रदान केले आहे. प्रजासत्ताक भारत प्रामुख्याने बंधुता तसेच राष्ट्रीय एकात्मतेवर उभा आहे. संविधानाने धर्मनिरपेक्षतेचा अंगीकार केला आहे. सर्व धर्मांना समान दर्जा दिला आहे. प्रत्येकास धर्मस्वातंत्र्य दिले आहे.

संविधानाने लोककल्याणकारी राज्याची हमी दिली आहे. राज्य धोरणाच्या निदेशक तत्वात (अनुच्छेद ३८, ३९, ४१) समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, कामगार हक्क, स्त्री आणि बालकल्याण इ. चा उल्लेख आहे. संविधानाने आर्थिक विषमता कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**तुलनात्मक विचार -** सम्राट अशोक कालीन समाज आणि भारतीय संविधान यांचा तुलनात्मक विचार केला असता बरीच साम्यस्थळे आपणास दिसून येतात. त्यामध्ये १) अशोककालीन समाजव्यवस्थेत बौद्ध धर्मासोबत सर्व धर्माचा आदर करण्यात आला. भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षता तसेच सर्व धर्मांना समान दर्जा दिला आहे. २) अशोककालीन समाजव्यवस्थेत जातीभेद कमी करण्याचा प्रयत्न केला तर भारतीय संविधानाने कायदेशीर समानता आणि अस्पृश्यता निर्मूलनावर भर दिला आहे. ३) अशोककालीन समाजव्यवस्थेत रूग्नालये, रस्ते, पर्यावरण संरक्षण अशी कल्याणकारी कामे करण्यात आली तर भारतीय संविधानाने कल्याणकारी राज्य, शिक्षण, आरोग्य, हक्कास प्राधान्य दिले आहे. ४) अशोककालीन समाजव्यवस्थेत स्त्री सन्मानावर भर दिला गेला तर संविधानाने स्त्रीयांना समान हक्क आणि संधी प्रदान केली आहे. ५) अशोककालीन समाजव्यवस्थेची अहिंसा, करुणा, सत्य ही नैतिक मूल्ये होती तर भारतीय संविधानाची न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, समता ही मूल्ये आहेत.

सम्राट अशोकाने ज्या तत्वांचा स्विकार आपल्या समाजव्यवस्थेत केला ते म्हणजे अहिंसा, समानता, करुणा, कल्याणकारी कार्य, धार्मिक सहिष्णूता इ. याच तत्वांचा स्विकार तसेच कायदेशीर रूप देण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले. सम्राट अशोकाचे धम्मावर आधारित समाजजीवन हे प्राचिन भारतातील नैतीकतेचे प्रतिक होते. तर भारतीय संविधान ही आधुनिक लोकशाही आणि मानवतेची जपणूक करणारी चौकट आहे. एकंदर अशोककालीन समाजव्यवस्था व भारतीय संविधान यांचा आधार समान असून ते मानवी कल्याणावर केंद्रित आहे असे म्हणता येते.

- **कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील वर्णाश्रम व्यवस्था आणि भारतीय संविधान -**

कौटिल्याचे अर्थशास्त्र हे राज्यशास्त्र/धोरणशास्त्र असून यामध्ये राज्यव्यवस्था, न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था, परराष्ट्रनीती याशिवाय समाजव्यवस्था अर्थात वर्णव्यवस्था या बाबींची स्पष्ट अशा प्रकारची मांडणी केलेली आहे. त्याने यामध्ये धर्मशास्त्राप्रमाणे धार्मिक दृष्टिकोन न ठेवता राज्य व्यवस्था व्यवस्थित चालावी याकरिता वर्णाश्रम धर्म हा राजकीय तसेच प्रशासकीय हेतूने वापरला. हिंदू समाजरचना ही प्रामुख्याने वर्णव्यवस्थेवर आधारित असून ती चार वर्णांमध्ये विभाजित आहे. कौटिल्याने याचा पुनरूच्चार केला. चार वर्णामध्ये ब्राम्हण (वेदअध्ययन, यज्ञयाग, दान-प्रतिदान तसेच धार्मिक सल्ला), क्षत्रिय (युद्ध, संरक्षण, शासन, प्रशासन), वैश्य (शेती, पशुपालन, व्यापार, अर्थनिर्मिती) तर शुद्र (उपरोक्त् सर्व वर्णाची सेवा चाकरी) अशा रितीने तीची रचना करण्यात आली ज्याने वर्णक्रमानुसार त्यांना प्रतिष्ठा देण्यात आली. ''वर्णव्यवस्थेचा सर्व प्रथम उल्लेख ऋग्वेदातील पुरूष सुक्तात आढळतो. हे सुक्त म्हणजे समाजपुरूषाचे रूपकात्मक वर्णन होय. समाजपुरूषाचे ब्राम्हण मुख असून क्षत्रिय बाहू होत. वैश्य वर्ण म्हणजे त्या समाजपुरूषाच्या मांडया असून शुद्र त्याच्या पायापासून निर्माण झाले, असे वर्णन हया सुक्तात केलेले आहे. हया वर्णनानुसार ब्राम्हण-क्षत्रिय-वैश्य-शुद्र असा वर्णव्यवस्थेचा क्रम होता. हे अगदी स्पष्ट दिसते'' (बोबडे-८). अशाच प्रकारचा वर्णव्यवस्थेचा क्रम वेदोत्तर अन्य सर्व ग्रंथांमधून दिसून येतो. या वर्णव्यवस्थेच्या आधारे त्या त्या वर्णांच्या कामाला धर्माचे स्वरूप देण्यात आले.

तसेच आश्रमव्यवस्थेला महत्व प्राप्त करुन देऊन त्याच आधारे कौटिल्याने या वर्णाश्रमधर्माचा उपयोग राज्याची शिस्त टिकविण्यासाठी केलेला दिसून येतो. राजा हा उपरोक्त सर्व वर्णाचे संरक्षण करतो मात्र तो वर्णभेदाच्या चौकटी मोडण्याच्या ऐवजी त्या चौकटी घट्ट करण्याचे काम करित असतो. प्रत्येकाने आपला वर्णधर्म अर्थात कर्तव्याचे पालन करावे अन्यथा त्यास दंड होईल असे कौटिल्याच्या अर्थशास्त्रात स्पष्ट करण्यात आले. याद्वारे एका वर्णाने दुसऱ्या वर्णाचे कार्य करणे हा अपराध मानला गेला.

सुरूवातीच्या काळात वर्णव्यवस्था ही लवचीक स्वरूपाची होती असे मानल्या जाते. ती कर्मावर आधारित असून समाज विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरली असेलही मात्र थोडयाच कालानंतर त्यात "कर्मआधारित जन्माला अधिक महत्व प्राप्त होऊन त्या व्यवस्थेतील लवचिकता नाहीशी झाली असे दिसते. वर्णव्यवस्थेचे स्पष्टीकरण करताना, तिची तात्विक बाजू सांगतांना, वर्णव्यवस्थेची कर्तव्यकर्माचे विवरण करतांना जी परिभाषा करण्यात येऊ लागली त्यावरुन जन्म हाच वर्णव्यवस्थेचा पाया झाला होता असे स्पष्ट होते. कारण अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, करणारा तो ब्राम्हण; रक्षण पालन करणारा तो क्षत्रिय असे सांगण्याऐवजी ब्राम्हणांची कर्तव्ये यजन-याजन, क्षत्रियाची रक्षण-पालन, वैश्याची कृषी, गोरक्षा व पशुपालन अशीच भाषा वापरलेली दिसते. हयाचा अर्थ कर्मानुसार वर्ण ठरविण्याऐवजी जन्मानुसार वर्ण ठरुन कर्म निश्चित करण्याला आरंभ झालेला होता" (बोबडे-१९). यामुळे एका वर्णाने दुसऱ्या वर्णाची कामे करणे दंडनीय अपराध मानल्या गेला. कौटिल्याने अर्थशास्त्रात शुद्रांना केवळ सेवा धर्म दिला असता तरी मात्र त्यांना संरक्षण तसेच उपजिविकेची साधने प्राप्त व्हावी याबाबतची तरतुद केल्याचे दिसते. ब्राम्हणांवर जर कोणी हल्ला केला तर त्यांस कठोर अशी शिक्षा तर शुद्रावर अन्याय झाल्यास त्याच तुलनेने (ब्राम्हणांच्या तुलनेने) हलकी शिक्षा देण्याची तरतुद करण्यात आली.

मुळातच कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ धार्मिक नव्हे तर राजकीय-प्रशासकीय ग्रंथ आहे. यात वर्णाश्रम धर्म एक प्रकारे समाजाची राज्यशास्त्रीय चौकट म्हणून घेण्यात आलेली दिसून येते. यात ब्राम्हणप्रधानता, श्रेणीबद्धता आणि जातीव्यवस्था घट्ट करणारा दृष्टीकोन दिसून येतो आणि म्हणून त्याचे हे अर्थशास्त्र वर्णाश्रम धर्माला लोकशाही अथवा समानतेचे तत्व म्हणून नव्हे तर केवळ राज्यकारभार करण्याकरिता आवश्यक अशी सामाजिक नियंत्रणाची एक चौकट म्हणूनच पाहता येईल.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील समाजरचना ही वर्णव्यवस्थेवर आधारित असून प्रत्येक वर्णाने आपल्या वर्णाचा धर्म पाळणे आवश्यक मानले असून त्याचे उल्लंखन केल्यास दंड अर्थात शिक्षा देण्याची तरतुद केली आहे. या समाजरचनेत ब्राम्हणाला सर्वोच्च स्थान तर शुद्राला सर्व वर्णाची सेवा करणे अर्थात सेवा-धर्म देण्यात आला. जो निम्नस्तरीय मानल्या गेला. तो श्रेणीबद्धतेवर आधारित होता. डॉ. आंबेडकरांनी या जातीव्यवस्थेला 'ग्रेडेड इनइक्वॅलिटी' (क्रमीक असमानता) असे म्हटले आहे. त्यांनी वर्णाश्रम धर्माला नाकारुन समतेवर आधारित समाज या बाबीला महत्व दिले असून भारतीय संविधानात कलम-१७ अन्वये अस्पृश्यता रद्द करुन तीचे पालन करणे गुन्हा ठरविण्यात आला आहे. कलम-१४ अन्वये सर्व कायदयापुढे समान तसेच कलम-१५ अन्वये जात, धर्म, पंथावर आधारित भेदभावास मनाई करण्यात आली आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात व्यक्तीस्वातंत्र्यावर बंधने असून व्यक्तीचा धर्म वर्णानुसार ठरविण्यात आला. तर भारतीय संविधानाने कलम-१९ नुसार प्रत्येकाला अभिव्यक्ती, व्यवसाय तसेच संघटन स्थापण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. कलम-२१ अनुसार प्रत्येकाला जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहे. कौटिल्याने बंधुता आणि समाज ऐक्यात केवळ वर्णधर्माला टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय संविधानात बंधुभावावर आधारित राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार केला आहे. कौटिल्याने संपत्ती आणि राजकीय सत्तेवर वरच्या वर्णाचा ताबा ठरविला. मात्र संविधानात कलम ३८, ३९, ४६ याद्वारे सामाजिक न्याय, आर्थिक न्याय आणि वंचितांचे संरक्षण प्रदान करण्यात आले आहे. एकूनच कौटिल्य हा विषमतेचा प्रचारक तर भारतीय संविधान स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित कायदयांचा दस्ताऐवज आहे जो नव्या भारताच्या निर्मितीतील महत्वपूर्ण घटक आहे.

- **मनुस्मृतीतील समाजव्यवस्था आणि भारतीय संविधान -**

भारतीय समाजाचा विकास हा प्रामुख्याने हजारो वर्षाच्या सामाजिक, धार्मिक तसेच सांस्कृतिक परंपरांवर आधारित असून या परंपरांवर अनेक धर्मशास्त्र, आचारसंहिता आणि स्मृतिग्रंथ यांचा प्रभाव आपणास दिसून येतो. यामध्ये सर्वात प्रभावशाली जो ग्रंथ आहे तो म्हणजे मनुस्मृती होय. यात आपणास प्राचिन समाजरचनेचे सविस्तर असे वर्णन दिसून येते. तर दुसरीकडे आपणास भारतीय संविधान (जे १९५० ला लागू झाले) हे आधुनिक लोकशाहीवादी तसेच मानवी मूल्यांवर आधारित दस्तऐवज आहे ज्याने समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्वांवर नवा समाज घडविण्याचा प्रयत्न करणारे दिसून येते.

मनुस्मृती आणि भारतीय संविधान या दोन ग्रंथांमधील समाजरचनेचा दृष्टीकोन पूर्णतः भिन्न असून एकीकडे जन्मावर आधारित आणि धर्मावर आधारित समाजव्यवस्था आहे तर दुसरीकडे समता तसेच मानवी अधिकारांवर आधारित लोकशाही व्यवस्था आहे.

**मनुस्मृतीमधील समाजरचना -** मनुस्मृती हा धर्म, आचार, नीती तसेच सामाजिक नियम सांगणारा ग्रंथ असून तो 'मनु' या प्राचिन ऋषींनी रचलेला आहे असे मानल्या जाते. या ग्रंथात समाज नियमन. धार्मिक आणि नैतिक आधारावर केलेले दिसून येते. मनुस्मृतीत समाजाचे वर्गीकरण चार प्रमुख वर्णात केले आहे. ते म्हणजे- ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र होय. त्याची निर्मिती मनुस्मृतीमध्ये अशी आहे.

**"लोकांना तु विवृद्धयर्थ मुखबाहूरूपादत:।**
**ब्राम्हणं क्षत्रियं वैश्यं शुद्रंच निरवर्तयत ।।१-३१।।"**

अर्थात-महाप्रजापती ब्रम्हाने स्वतःच लोकबुद्धीसाठी आपल्या मुखातून ब्राम्हण, बाहूपासून क्षत्रिय, मांडयांपासून वैश्य आणि पायातून शुद्राला उत्पन्न केले (भदंत आनंद कौशल्यायन - २९).

अशा प्रकारे चार वर्णांची निर्मिती झाली अजून त्यांचे कार्यसुद्धा निर्धारित केले आहे. ते म्हणजे १) ब्राम्हण-अध्यापन, यज्ञ, धर्मसंस्कार आणि मार्गदर्शन करणे. २) क्षत्रिय - शासन आणि राज्यरक्षण करणे. ३) वैश्य - शेती व्यापार आणि पशुपालन करणे. ४) शुद्र - उपरोक्त तिन्ही वर्णांची सेवा करणे इत्यादी होय.

मनुस्मृतिमध्ये सर्वच स्त्रियांचे स्थान हे निम्न स्वरूपाचे अर्थात शुद्राच्या स्वरूपात दिसून येते. तिला स्वतंत्र असे अस्तित्व दिले नसुन पिता, पती आणि पुत्राच्या अधिन ठेवण्यात आले. याबाबत मनुस्मृतीत पुढील श्लोक आहे.

**"पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।**
**रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।।९-३५।।"**

अर्थात - कुमारी असताना स्त्रीचे रक्षण पिता करतो. तरुण झाल्यावर पती आणि म्हातारपणी तिचे रक्षण पुत्र करतो. स्त्री कधीही स्वातंत्र्याला योग्य नसते (आगलावे - १०१).

मनुने स्त्रियांकरिता एकमेव संस्कार सांगितला असून तो म्हणजे विवाह हा होय. तीला मनुस्मृतीने शिक्षण, वारसा हक्क तसेच सार्वजनिक जीवनातील सहभाग यापासून वंचित ठेवण्यात आले. तिचे कर्तव्य म्हणजे विवाह, मातृत्व आणि सेवा हेच होय.

मनुस्मृतीमध्ये समाजातील निम्न घटकांना 'अस्पृश्य' म्हणून घोषीत करुन त्यांना धार्मिक विधी, शिक्षण आणि सामाजिक सन्मानापासून दूर ठेवले गेले. अशी ही व्यवस्था सामाजिक शोषण आणि अन्याय करणारी ठरली.

मनुस्मृतीमध्ये राज्यकर्ता हा धर्मशास्त्राच्या अधिन राहून शासन करतो. त्याला धर्माचा रक्षक मानल्या गेले. न्याय, शिस्त आणि कर हे सर्व धार्मिक तत्वानुसार ठरवले जात असे. या व्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य अथवा समानतेची संकल्पना नव्हती.

**भारतीय संविधानातील समाजरचना -** ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या संचलनासाठी संविधानाची निर्मिती करण्यात आली आणि ती १९५० मध्ये लागू झाली. ती लोकशाही आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांस समानतेचा अधिकार (कलम १४ ते १८) दिला. त्यानुसार सर्व नागरिकांना कायदयापुढे समानता दिली. धर्म, जात, लिंग, जन्मस्थान यावर आधारित कोणत्याही भेदभावास मनाई करण्यात आली. कलम १७ अन्वये अस्पृश्यता नष्ट करुन ती दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आली. कलम १५ (४) व १६(४) अंतर्गत मागास घटक, अनुसुचित जाती व जमाती यांना आरक्षणाद्वारे सामाजिक न्याय मिळवून देण्याची तरतुद करण्यात आली.

सर्व नागरिकांना संविधानाने स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२) दिला. मनुस्मृतीने समाजातील प्रत्येक घटकांवर जी बंधने घातली होती मात्र संविधानाने सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, धर्म, संचार आणि व्यवसायाचे स्वातंत्र्य दिले आहे.

भारतीय संविधानाने भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषीत केले आहे. राज्य कोणत्याही धर्माला प्राधान्य देणार नाही तर सर्व धर्मांना समान वागणूक आणि स्वातंत्र्य प्रदान केले आहे. ही संकल्पना पूर्णतः मनुस्मृतीतील धर्मकेंद्रित व्यवस्थेच्या विरोधी आहे.

संविधानाने सामाजिक न्यायाला महत्व दिले असून अनुसुचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्ग यांना शिक्षण, रोजगार व राजकीय प्रतिनिधित्वात आरक्षण बहाल केले आहे. स्त्री-पुरुष समानतेला प्राधान्य दिले आहे. तसेच बालक, कामगार आणि दूर्बल घटक यांच्या हक्कांचे संरक्षण केले आहे.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत 'बंधुता' या तत्वाचा समावेश करण्यात आला आहे. अर्थात सर्व नागरिकांनी एकमेकांशी सन्मान आणि समानतेने वागावे. हे तत्व प्रामुख्याने मनुस्मृतीमधील श्रेणीबद्ध समाजव्यवस्थेच्या पूर्णतः विरोधी आहे.

थोडक्यात मनुस्मृती हा आपल्या प्राचिन समाजाचा आरसा आहे. त्यात त्या काळातील धर्मविषयक विचार, सामाजिक श्रेणीबद्धता आणि नैतिकता प्रतिबिंबित झालेली दिसून येते. या व्यवस्थेत समानतेचा अभाव, स्त्री-दमन आणि अस्पृश्यतेसारखे अन्यायकारक प्रघात दिसून येतात. मात्र भारतीय संविधानाने या सर्व अन्यायांना नाकारले असून एक नवे युग जे मानवतेवर आधारित लोकशाही युग अंगीकारले आहे. भारतीय संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तत्वावर आधारित नवी समाजरचना उभारली आहे.

आजचा नवा भारत हा मनुस्मृतीमधील भेदभावपूर्ण व्यवस्थेच्या राखेतून उभा राहिलेला असून तो समानतावादी आहे. संविधानाच्या मते प्रत्येक नागरिक हा त्याची जात, धर्म, लिंग कोणतेही असो तो राष्ट्राचा समान तसेच सन्मानिय असा घटक आहे.

### ❖ निष्कर्ष -

प्रस्तुत अध्ययन 'भारतीय समाजव्यवस्था (प्राचिन आणि आधुनिक) आणि भारतीय संविधान' यात असे दिसून येते की, प्राचिन तसेच आधुनिक समाजव्यवस्थेत तसेच भारतीय संविधानामधील बऱ्याच तरतुदींमध्ये साम्यस्थळे तसेच विरोधाभास दिसून येतो. भारतीय संविधानाद्वारे भारतीय समाजव्यवस्थेत स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व आणि न्याय या मानवी मूल्यांना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. एक नवी समाजरचना जी न्यायावर आधारित असेल, प्रत्येकाला स्वातंत्र देणारी असेल, बंधुभाव निर्माण करणारी असेल व कायदयासमोर सर्वांना समानता प्रस्थापित करणारी असेल यावर अधिक भर देण्यात आला आहे.

भारतीय समाज हा विषमतेने, जातीभेदाने, लिंगभेदाने, आर्थिक असमानतेने बरबटला आहे. यावर मात करण्याकरिता भारतीय संविधानात नागरिकांना मूलभूत अधिकार, सामाजिक न्यायाचे तत्व, राज्याची धोरणनिर्देशक तत्वे, शैक्षणिक संधी, आर्थिक संधी, आरक्षण व्यवस्था याप्रमाणे अनेक उपाययोजना बहाल केल्या गेल्या आहेत. याआधारे भारतीय संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नाही तर भारतीय समाजास आधुनिकतेकडे, समताधिष्ठित तसेच सर्वसमावेशक दिशेने नेणारे एक सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. भारतीय संविधान प्रगत तसेच न्याय्य समाज निर्माण करण्याचा मार्ग दाखवते. संविधानाच्या आधारे हे सहजसाध्य होऊ शकते. म्हणून संविधानातील तरतुदींचा अम्मल होणे आवश्यक आहे.

### ❖ संदर्भ सूची


- आगलावे, डॉ. सरोज (२०१८), जोतीराव फुले सामाजिक तत्वज्ञान, औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन
- कौसल, भि. म. (२०२१) , मनुस्मृतीची बुद्धिवादी समिक्षा, नागपूर: समता प्रकाशन
- कौसल्यायन, डॉ. भदंत आनंद (२०१०), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली?, नागपूर: बुद्धभूमि प्रकाशन
- पाटील, शरद् (१९९९) बुद्धः भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्त्रोत, येवला : सावित्रीबाई फुले प्रकाशन
- बोबडे, डॉ. प्रकाश (२०१०), भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, नागपूर: श्री मंगेश प्रकाशन
- लव्हात्रे, बबन (२०१६), विश्‍वहृदय सम्राट अशोक, नागपूर: प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय
- संविधान (२०२५) भारताचे संविधान, नागपूर: पास पब्लिकेशन्स कंपनी